दैनिक
E-Mail:dainikmhavratt@gmail.com
# महावृत्त
संपादक-अशोक हनवते.मो-9421094991,7264079990




लातूर वर्ष ४ थे अंक २१९ वा गुरूवार दि.२० फेब्रुवारी २०२५ पृष्ठे ४ स्वागत मूल्य २ रू.

# पंतप्रधान नरेंद्र मोदींचे शिवरायांना अभिवादन

नवी दिल्ली : वृत्तसंस्था संपूर्ण राज्यभरात शिवजयंतीचा उत्साह सुरू आहे. याच पार्श्वभूमीवर छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी शिवाजी महाराजांना ट्विटरवरून अभिवादन केले. छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पराक्रमाने आणि दूरदर्शी नेतृत्वाने स्वराज्याची पायाभरणी केली असल्याचे मोदींनी ट्विटरवर म्हटले आहे.

छत्रपती शिवाजी महाराजांच्या ३९५ व्या जयंतीनिमित्त आज बुधवारी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी त्यांना आदरांजली वाहिली. याच वेळी, संरक्षण मंत्री राजनाथ सिंह, केंद्रीय गृहमंत्री अमित शहा, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासह अनेक नेत्यांनी श्रद्धांजली वाहिली आणि शिवाजी महाराजांच्या शौर्य, न्याय आणि समर्पणाचे स्मरण केले. शिवाजी महाराजांनी मराठा साम्राज्याची स्थापना केली आणि मुघल शासकांविरुद्ध युद्धे लढली. त्यांच्या शौर्याची गाथा इतिहासात सुवर्णाक्षरांनी लिहिली गेली आहे. त्यांचे शौर्य केवळ महाराष्ट्रातच नव्हे तर संपूर्ण देशात प्रेरणास्रोत मानले जाते.



छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त मी त्यांना अभिवादन करतो. त्यांच्या पराक्रमाने आणि दूरदर्शी नेतृत्वाने स्वराज्याची पायाभरणी केली, ज्यामुळे अनेक पिढ्यांना धैर्य आणि न्यायाची मूल्ये जपण्याची प्रेरणा मिळाली. ते आपल्याला एक बलशाली, आत्मनिर्भर आणि समृद्ध भारत घडवण्यासाठी प्रेरणा देत आहेत, असे पंतप्रधान मोदी म्हणाले.

# लातुरात जय शिवाजी, जय भारत पदयात्रेला उत्स्फूर्त प्रतिसाद !

## सळसळत्या उत्साहात घुमला 'जय भवानी, जय शिवाजी'चा नारा










लातूर :- छत्रपती शिवाजी महाराज यांच्या ३९५ व्या जयंतीनिमित्त केंद्र शासनाच्या निर्देशानुसार लातूर जिल्हा प्रशासनाने आयोजित केलेल्या जय शिवाजी, जय भारत पदयात्रेला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. दयानंद महाविद्यालयाच्या मैदानातून सुरु झालेल्या या पदयात्रेत विद्यार्थी, अधिकारी-कर्मचारी, नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. ढोल-ताशांच्या तालावर विद्यार्थी-विद्यार्थिनींच्या लेझीम पथक, झांज पथकाने केलेल्या सादरीकरणाने यावेळी उपस्थितांची मने जिंकली. तसेच यावेळी जय भवानी, जय शिवाजी या घोषणेने सर्व परिसर दुमदुमून गेला. आमदार विक्रम काळे, जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांच्या हस्ते हिरवी झेंडी दाखवून पदयात्रेला सुरुवात झाली. जिल्हा पोलीस अधीक्षक सोमय मुंडे, लातूर शहर महानगरपालिका आयुक्त बाबासाहेब मनोहरे, जिल्हा परिषदेचे प्रभारी मुख्य कार्यकारी अधिकारी असलम तडवी, प्रभारी अपर जिल्हाधिकारी संगीता टकले, निवासी उपजिल्हाधिकारी केशव नेटके, उपजिल्हाधिकारी संदीप कुलकर्णी, अहिल्या गाठाळ, उपविभागीय अधिकारी रोहिणी नऱ्हे-विरोळे, जिल्हा नियोजन अधिकारी सोमनाथ रेड्डी, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेच्या प्रकल्प संचालक कल्पना क्षीरसागर, जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी ले. कर्नल शरद पांढरे (नि.), जिल्हा क्रीडा अधिकारी जगन्नाथ लकडे, महानगरपालिका उपायुक्त पंजाबराव खानसोळे, माध्यमिकचे शिक्षणाधिकारी नागेश मापारी, प्राथमिकच्या शिक्षणाधिकारी वंदना फुटाणे, योजना शिक्षणाधिकारी तृप्ती अंधारे यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी, कर्मचारी यावेळी उपस्थित होते.

जय शिवाजी, जय भारत पदयात्रेमध्ये जिल्ह्यातील नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी होण्याचे आवाहन जिल्हा प्रशासनाच्यावतीने करण्यात आले होते. या आवाहनाला उत्स्फूर्त प्रतिसाद देत जवळपास दीड ते दोन हजार विद्यार्थी, नागरिक यांच्यासह अधिकारी, कर्मचारी या पदयात्रेत सहभागी झाले होते. यामध्ये अनेक विद्यार्थी, अधिकारी, कर्मचारी यांनी छत्रपती शिवाजी महाराज, मावळे, वारकरी आदी पारंपारिक वेशभूषा केल्या होत्या. यावेळी ढोल-ताशांच्या गजरात विविध शाळा, महाविद्यालयांच्या लेझीम, झांज पथकांचे सादरीकरण सर्वांचे लक्ष वेधून घेत होते. दयानंद महाविद्यालयाचे प्रा. डॉ. संदीपान जगदाळे यांनी सादर केलेला छत्रपती शिवाजी महाराजांच्या कार्यावरील पोवाडा आणि उपस्थितांकडून देण्यात आलेल्या 'जय भवानी, जय शिवाजी' या घोषणांमुळे संपूर्ण परिसरात उत्साहपूर्ण वातावरण निर्माण झाले होते. या सळसळत्या उत्साहात दयानंद महाविद्यालयाच्या मैदानातून पदयात्रेला सुरुवात झाली. अश्वारूढ झालेल्या छत्रपती शिवाजी महाराजांच्या वेशभूषेतील विद्यार्थी आणि चित्ररथ या पदयात्रेच्या अग्रस्थानी होता. पदयात्रा दयानंद महाविद्यालयाचे मुख्य प्रवेशद्वार येथे आल्यानंतर लेझीम व झांज पथकाचे सादरीकरण झाले. त्यानंतर पदयात्रा छत्रपती शिवाजी महाराज चौकाकडे मार्गस्थ झाली. छत्रपती संभाजीनगर शिक्षक मतदारसंघाचे आमदार विक्रम काळे, जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे, जिल्हा पोलीस अधीक्षक सोमय मुंडे, लातूर शहर महानगरपालिका आयुक्त बाबासाहेब मनोहरे, जिल्हा परिषदेचे प्रभारी मुख्य कार्यकारी अधिकारी असलम तडवी यांच्यासह सर्व उपस्थितांनी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. पुन्हा दयानंद महाविद्यालयाच्या मैदानावर आल्यानंतर पदयात्रेचा समारोप करण्यात आला. जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयामार्फत या यात्रेचे संयोजन करण्यात आले.

### छत्रपती शिवाजी महाराजांच्या इतिहासातून राष्ट्रभक्तीची प्रेरणा : आमदार विक्रम काळे

जय शिवाजी, जय भारत पदयात्रेच्या माध्यमातून आज राज्यात सर्वत्र छत्रपती शिवाजी महाराजांना अनोख्या पद्धतीने अभिवादन करण्यात येत आहे. छत्रपती शिवाजी महाराजांचे कार्य, त्यांचा जाज्वल्य इतिहास सर्वांसाठी प्रेरणादायी आहे. या इतिहासातून नव्या पिढीला राष्ट्रप्रेमाची प्रेरणा मिळत राहील, असा विश्वास आमदार विक्रम काळे यांनी यावेळी व्यक्त केला. तसेच या पदयात्रेत सहभागी झालेल्या सर्वांना छत्रपती शिवाजी महाराज जयंतीनिमित्त शुभेच्छा दिल्या.

### छत्रपती शिवाजी महाराजांचे विचार सर्वांसाठी मार्गदर्शक : जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे

छत्रपती शिवाजी महाराज यांचे कार्य आणि विचार सर्वांसाठी मार्गदर्शक आहेत. आजच्या युगात युवकांनी त्यांचे विचार आत्मसात करून आपल्या ध्येयाकडे वाटचाल केल्यास नक्कीच यशप्राप्ती होईल, असे जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यावेळी म्हणाल्या. तसेच जय शिवाजी, जय भारत पदयात्रेत युवा वर्गाने मोठ्या उत्साहात सहभाग नोंदविल्याबद्दल सर्वांचे अभिनंदन करून छत्रपती शिवाजी महाराज जयंतीनिमित्त शुभेच्छा दिल्या. प्रारंभी निवासी उपजिल्हाधिकारी केशव नेटके यांनी प्रास्ताविकामध्ये जय शिवाजी, जय भारत पदयात्रा आयोजनाचा हेतू विशद केला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन उद्धव फड यांनी केले. या पदयात्रेत पुरणमल लाहोटी शासकीय तंत्र निकेतनचे ढोल-तशा पथक, दयानंद कला महाविद्यालय, दयानंद वाणिज्य महाविद्यालय, शाहू महाविद्यालय, माउंट लिटेरा झी स्कूल, पोद्दार इंटरनॅशनल स्कूल, राजस्थान विद्यालय, देशिकेंद्र विद्यालय, शिवाजी विद्यालय, केशवराज विद्यालय, सदानंद माध्यमिक विद्यालय, श्री श्री श्री रविशंकर विद्यालय, प्रयागबाई पाटील विद्यालय, बसवेश्वर महाविद्यालय, दयानंद विज्ञान महाविद्यालय व ज्ञानेश्वर विद्यालयाचे विद्यार्थी, झांज पथके, लेझीम पथके या सहभागी झाली होती. या पदयात्रेनिमित्त दयानंद महाविद्यालय परिसरात उमेद अभियान अंतर्गत महिलाबचत गटांची दालनेही उभारण्यात आली होती.

# ई-केवायसीसाठी मुदतवाढ द्यावी ;व्हाईस ऑफ मीडियाची मागणी

किनवट: शेख शौकत :-शिधापत्रिकेत कुटूबांतील ज्यांची नावे आहेत त्या सर्वांनी ई-केवायसी करणे अनिवार्य असून सद्या सर्वत्र चालू आहे. परंतू सद्या इयत्ता बारावीच्या वार्षीक परिक्षा चालू असल्यामुळे परिक्षार्थीचा ई-केवायसी होतांना दिसत नाही. कुटूंबातील एकही घटक ई केवायसी पासून वंचित राहू नये यासाठी शासन व स्थानिक महसूल प्रशासनाने २८ फेब्रुवारी पर्यंत दिलेली मुद्दत रद्द करुन ३१ मार्च पर्यंत मुद्दत वाढ देण्याची व्हाईस ऑफ मीडियाच्या किनवट शाखेने मागणी करणारे निवेदन आज (१८ फेब्रु.) तहसिलदारांना दिले आहे. शिधापत्रिकेत कुटूंबातील सर्वांचीच नावं लिहिलेली असतात. शिधापत्रिका अद्ययावत करण्यासाठी ई केवायसी बंधनकारक केली आहे. शिधापत्रिके ला आधार कार्ड व थम लिंक आवश्यक आहे. मात्र सद्या बारावीच्या वार्षीक परिक्षा चालू आहेत. त्यामुळे विद्यार्थी ई-केवायसीसाठी व्यक्त केलीय. हजर राहू शकत नाहीत. मार्च २०२५ अखेरपर्यंची शासन व प्रशासनाने मुद्दतवाढ करावी लागेल. तरच कुटूंबातील सर्वांची ई-के वायसी होणार आहे. मुद्दतवाढ न दिल्यास परिक्षार्थी ई-केवायसीपासून वंचित म्हणजेच शासन मान्य रास्त भाव दुकानातील धान्यासह सुविधांपासून वंचित तर राहावेच लागेल शिवाय पत्रिकेतून नावही कमी होण्याची अनेक शिधापत्रिका धारकांनी भीती व्यक्त केलीय.

# भारतीय बौद्ध महासभा व समता सैनिक दल लातूर बटालियनच्या वतीने छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त विनम्र अभिवादन

लातूर :- भारतीय बौद्ध महासभा महिला जिल्हा शाखा व समता सैनिक दल लातूर बटालियन च्या वतीने कुळवाडी भूषण रयतेचे राजे छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त छत्रपती शिवाजी महाराज चौक लातूर येथे अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी महाराष्ट्र राज्य संघटक प्रा. बापूसाहेब गायकवाड, समता




सैनिक दलाचे डिव्हिजन ऑफिसर विकास दंतराव, डिव्हिजन ऑफिसर विलास आल्टे, जिओसी तथा महिला जिल्हाध्यक्ष शारदाताई हजारे, सरचिटणीस वंदनाताई कांबळे, जिल्हा कोषाध्यक्ष ज्ञानेश्वरी ताई बटवाड, जिल्हा सचिव अभिमन्यू लामतुरे, जिल्हा सचिव आनंद डोणेराव, महिला कोषाध्यक्ष मायाताई कांबळे जिल्हा उपाध्यक्ष मंगलताई सुरवसे, केंद्रीय शिक्षिका सुरेखाताई भालेराव, सत्यशोधक समाज महासंघ महिला राज्याध्यक्ष मंगल ताई कांबळे, जिल्हा सचिव देवदत्त बनसोडे, तालुकाध्यक्ष सुनीताताई भालेराव, तालुकाध्यक्ष डी.पी. भोसले, केंद्रीय शिक्षक लक्ष्मण कांबळे, राजेंद्र क्षीरसागर, राजाभाऊ उबाळे, राजेंद्र हजारे, संजय गायकवाड सैनिक बिभीषण गंभीरे आदी उपस्थित होते.



कोल्हे नगर लातूर येथे शिवजयंती उत्सहात साजरी झाली या वेळी बालाजी बडे. मालिशे समर्थ. बलभीम धुमाळ .रत्नाकर केंद्रे. हुकूम धावारे .विशाल कांबळे. किरण स्वामी. शैलेश सुर्यवंशी.या सह शिवप्रेमी मोठया संख्येने उपस्थित होते..

# अवादा कंपनीच्या माध्यमातून प्रयागराज कुंभमेळा शाही स्नान करून गावाकडे निघाले सर्व भाविक

केज/प्रतिनिधी बीड जिल्ह्यातील केज तालुक्यातील येवता येथील ४९ भाविक अवादा कंपनीच्या माध्यमातून प्रयागराज येथील महाकुंभमेळा शाही स्नान करण्यासाठी आज सकाळी प्रयागराज संगमावर सर्व भाविकानी स्नान करून गावाकडे प्रस्थान करण्यासाठी तयार झाले होते. यावेळी भाविकांतून अवादा कंपनीच्या कर्मचाऱ्यांनी आम्हाला प्रयागराज कुंभमेळा शाही स्नान घडवून आणल्याबद्दल अवादा कंपनीचे कर्मचारी राहुल देटे यांच्या मार्गदर्शनाखाली राहुल यादव यांनी सर्व




भाविकांना कुंभमेळ्यात सर्वांना शाही स्नान घडवून आणले हे यथोचित भाविकांची सोय केल्यामुळे सर्व भाविकांनी राहुल यादव सर यांचे आभार व्यक्त केले आहे. यावेळी गावातील प्रमुख वसंत सोनवणे व प्रताप जोगदंड यांनी सर्व गावकऱ्यांना सोबत घेऊन शाही स्नान घडवून आणल्यामुळे गावकऱ्यांच्या वतीने आभार व्यक्त केले जात आहे.

# भारतीय बौद्ध महासभा लातूर पश्चिम कार्यकारिणी गठीत करण्यासाठी बैठकीचे आयोजन

लातूर :- भारतीय बौद्ध महासभेच्या वतीने 'संविधान समर्थक समाज जोडो' या अभियानांतर्गत लातूर जिल्हा पश्चिम विभाग कार्यकारणीचे पुनर्गठन करण्यासाठी शनिवार दिनांक २२ फेब्रुवारी २०२५ रोजी सकाळी ठीक ११.०० वाजता मुलगंध कुटी बुद्ध विहार सुभेदार रामजी नगर, लातूर येथे व्यापक सर्वसाधारण सभेचे आयोजन करण्यात आले आहे. या बैठकीसाठी भारतीय बौद्ध महासभेचे प्रदेश सरचिटणीस मा.अशोक केदार व मा. भिमराव मरेप्पा कांबळे हे उपस्थित राहून भारतीय बौद्ध महासभेच्या निकषांच्या आधारे नवीन कार्यकारणी गठन करून मार्गदर्शन करणार आहेत.

तरी या बैठकीसाठी भारतीय बौद्ध महासभेच्या पश्चिम जिल्हा कार्यकारिणीचे सर्व पदाधिकारी,समता सैनिक दल,तालुका शहर, ग्राम शाखा, केंद्रीय शिक्षक,शिक्षिका बौध्दाचार्य,आजीवन सक्रिय सभासद, श्रामणेर व भारतीय बौद्ध महासभेशी संबंधित असलेल्या हितचिंतक उपासक व उपासिका यांनी या बैठकीसाठी वेळेवर उपस्थित रहावे.असे आवाहन भारतीय बौद्ध महासभा लातूर जिल्हा पश्चिम विभागाचे अध्यक्ष एम.एम. बलांडे व सरचिटणीस अशोक शिंदे यांनी केले आहे.

# सिंधू नदीत सापडला सोन्याचा खजिना; पाकिस्तानात झुंबड



अटक : वृत्तसंस्था दहशतवाद आणि अंतर्गत संघर्षाने पोखरल्या गेलेल्या पाकिस्तानची अर्थव्यवस्था मागच्या काही वर्षात डबघाईला आलेली आहे. अशा परिस्थितीत आर्थिक मदतीसाठी जगभरात हात पसरत फिरत असलेल्या पाकिस्तानच्या हाती खजिना लागला असून, येथील सिंधू नदीमध्ये सोन्याचे साठे सापडले आहेत. नदीत सोनं सापडत असल्याचं समजल्यापासून येथील सोनं गोळा करण्यासाठी लोकांची झुंबड उडत आहे.

पाकिस्तानमधील सिंधू नदीमध्ये सुमारे ८०० अब्ज पाकिस्तानी रुपये एवढ्या किमतीचे सोने सापडले आहे. या सोन्याचं वजन सुमारे ६५३ टन एवढं आहे. हे सोनं मिळवण्यासाठी लोक नदी पात्राकडे धाव घेत आहेत. सोनं मिळवण्यासाठी लोक दिवसभर नदीच्या पात्रात भांडीकुंडी घेऊन सोनं गोळा करण्याचा प्रयत्न करतात. त्यानंतर स्लुइस मॅटचा वापर करून सोनं बाहेर काढलं आहे. या परिसरात आधी छोट्या प्रमाणावर खाणकाम सुरु होते. परंतू आता येथे मोठ्या संख्येने लोक खोदकाम करण्यासाठी जमा झाले असून लोक बादली भरुन येथील वाळू आपल्या घरी नेत आहेत.

पाकिस्तानमधील पंजाबचे माजी खाण आणि खनिजमंत्री इब्राहिम हसन मुराद यांनी पाकिस्तानचे भूवैज्ञानिक सर्वेक्षणाच्या एका अहवालाच्या आधारावर अटकजवळ ८०० अब्ज रुपयांचं सोन्याचे साठे सापडल्याची माहिती दिली होती. पूर्ण नऊ ब्लॉक असलेल्या या परिसरातील सर्वात मोठ्या ब्लॉकमध्ये १५५ अब्जांपर्यंतचं सोनं असू शकतं.

मात्र सिंधू नदीमध्ये सोन्याच्या शोधासाठी सुरू असलेल्या खोदकामाबाबत पर्यावरणवाद्यांनी चिंता व्यक्त केली आहे. त्यांच्या मते नदीच्या तळाला होणा-या प्रमाणाबाहेरील खोदकामामुळे पाण्यामधील जीवसृष्टीवर परिणाम होऊ शकतो. तसेच सोनं काढण्यासाठी पा-याचा वापर होत असल्याने नदीची इकोसिस्टिम बिघडू शकते.

# समता सैनिक अभिमन्यू लामतुरे यांची कंपनी कमांडर पदी निवड




लातूर :- बोधिसत्व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी २० मार्च १९२७ रोजी स्थापन केलेल्या समता सैनिक दलाचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा भारतीय बौद्ध महासभेचे राष्ट्रीय कार्याध्यक्ष डॉ. भीमराव साहेब आंबेडकर संपूर्ण देशामध्ये समता प्रस्थापित करण्याचे कार्य करत आहेत आणि इंडियन आर्मीच्या धरतीवर सदरील सैनिकांना बुद्धांचे विश्व विद्यापीठ चैत्यभूमी दादर, मुंबई येथे झालेल्या प्रशिक्षण देऊन स्वतः चे, समाजाचे व देशाचे संरक्षण करण्यासाठी सक्षम सैनिक निर्माण करून विविध पदावर नियुक्ती केली जाते. या शिबिरामध्ये भारतीय बौद्ध महासभा समता सैनिक दल लातूर जिल्हा सचिव अभिमन्यू लामतुरे यांची कंपनी कमांडर पदी निवड करण्यात येऊन जिल्हा बिदर कर्नाटक येथे झालेल्या कार्यक्रमांमध्ये डॉ भीमराव आंबेडकर* यांच्या हस्ते समता सैनिक कंपनी कमांडर पदाचे स्टार* लावून सन्मानित करण्यात आले. यावेळी महाराष्ट्र राज्य संघटक प्रा. बापूसाहेब गायकवाड, समता सैनिक दलाचे मेजर जनरल राजाराम साबळे, डिव्हिजन ऑफिसर विकास दंतराव, डिव्हिजन ऑफिसर विलास आल्टे, जिओसी तथा महिला जिल्हाध्यक्ष शारदाताई हजारे, महिला जिल्हा सरचिटणीस वंदनाताई कांबळे, जिल्हा कोषाध्यक्ष ज्ञानेश्वरी ताई बटवाड, जिल्हा संघटक अर्जुन कांबळे, राजेंद्र क्षीरसागर, राजाभाऊ उबाळे, राजेंद्र हजारे आदी उपस्थित होते.

# स्वामी विवेकानंद शाळेमध्ये दहावीच्या विद्यार्थ्यांचा निरोप समारंभ कार्यक्रम संपन्न




केज/प्रतिनिधी जीवन विकास शिक्षण मंडळ केज संचलित, स्वामी विवेकानंद विद्यामंदिर माध्यमिक विभाग या शाळेमध्ये इयत्ता दहावीच्या विद्यार्थ्यांचा निरोप समारंभ कार्यक्रम संपन्न झाला. याप्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून अंकुशराव इंगळे अध्यक्ष, जीवन विकास शिक्षण मंडळ तथा सभापती, कृषी उत्पन्न बाजार समिती केज, तर प्रमुख पाहुणे म्हणून अंबेजोगाई येथील अप्पर पोलीस अधीक्षक श्रीमती. चेतनाताई तिडके या उपस्थित होत्या. प्रमुख उपस्थित मान्यवरांमध्ये डॉ. वसुदेव नेहरकर उपसभापती, कृषी उत्पन्न बाजार समिती केज, संस्थेचे सचिव गिन्यानदेव गदळे, शालेय व्यवस्थापन समितीच्या अध्यक्षा शैलाताई इंगळे, शाळेच्या मुख्याध्यापिका शिवनंदा मुळे आदी उपस्थित होते. कार्यक्रमाच्या सुरुवातीस उपस्थित मान्यवरांचे स्वागत प्रबोधकांत समुद्रे यांनी शब्द सुमणे अंत करणे' हे गीत गाऊन केले. कार्यक्रमाचे प्रस्तावित व पाहुण्यांचा परिचय संस्थेचे सचिव गिन्यानदेव गदळे यांनी दिला याप्रसंगी ते म्हणाले, विद्यार्थ्यांनी भविष्यातील विविध आव्हानांना सामोरे जाताना कोणत्याही मोहाला बळी न पडता ध्येयाकडे वाटचाल करावी. पुढे दहावीतील काही विद्यार्थ्यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या, याप्रसंगी त्यांनी शिक्षकाप्रती आभार सुमने मांडताना आठवणींना उजाळा देण्याचा प्रयत्न केला. कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे चेतना तिडके याप्रसंगी बोलताना म्हणाल्या, शाळेच्या पहिल्या दिवशी आईचे बोट धरून शाळेत न जाण्यासाठी आपण रडतो, आणि शाळेच्या शेवटच्या दिवशी शाळा न सोडण्यासाठी रडतो. शालेय जीवनातून आपण बऱ्याच गोष्टी आत्मसात करत असतो परंतु जीवनामध्ये ध्येय प्राप्तीसाठी आपण एकनिष्ठ राहिले पाहिजे तरच आपण यशस्वी होऊ शकतो. या स्पर्धेच्या युगात टिकायचे असेल तर प्रत्येकाला स्वतःच वेगळं अस्तित्व निर्माण कराव लागेल. 'वाचनानेच सामर्थ्य मिळत' तेंव्हा अभ्यासाचे योग्य नियोजन करणे गरजेचे आहे. डॉ. वसुदेव नेहरकर याप्रसंगी बोलताना म्हणाले, विद्यार्थ्यांनी संस्कारक्षम शिक्षण घ्यावे. या शाळेतील विद्यार्थी व शिक्षक यांचे अत्यंत जिव्हाळ्याचे नाते आहे. तेंव्हा ही शाळा गुणवत्तेसाठी नामांकित असणाऱ्या मराठवाड्यातील अग्रगण्य शाळेपैकी एक शाळा आहे. अध्यक्षीय समारोपात अंकुशराव इंगळे म्हणाले, विद्यार्थ्यांनी दहावी बोर्डाच्या परीक्षेमध्ये सर्वाधिक गुण घेऊन आपल्या शाळेचे नावलौकिक करावे. शिक्षकांनी घेतलेल्या कष्टाचे फळ, तुमच्या गुणवत्तेतून दिसून यावेत ही अपेक्षा आहे. याप्रसंगी संघर्ष पत्रकार संघ केज आयोजित तालुकास्तरीय नृत्य स्पर्धेमध्ये आपल्या शाळेतील इयत्ता सहावी अ मधील विद्यार्थिनींनी शेतकरी नृत्य सादर करून या स्पर्धेतील तृतीय पारितोषिक सन्मानचिन्ह व ५५५५ रुपये रोख पटकाविले, तसेच इयत्ता नववी अ मधील विद्यार्थिनी अक्षरा येडे हिने वैयक्तिक नृत्यांमध्ये द्वितीय पारितोषिक सन्मानचिन्ह व ३३३३ रुपये रोख पटकाविले, त्याबद्दल विद्यार्थ्यासह मार्गदर्शक प्रबोधकांत समुद्रे यांचा उपस्थित मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. शेतकरी लोकगीत कुर्या चालल्या रानात नृत्यातील सहभागी विद्यार्थी प्राची ढोबळे, अपूर्वा सोनवणे, श्रावणी लोंढे, श्रेया धपाटे, संस्कृती गायकवाड, तेजस्विनी कापरे, सृष्टी अडसूळ, राजनंदिनी सोनवणे, श्रद्धा काकडे, श्रुती सावंत, किशोरी मुळे, नंदिनी सपाटे आदी. कार्यक्रमाच्या सूत्रसंचलन सांस्कृतिक विभाग प्रमुख प्रबोधकांत समुद्रे यांनी केले तर आभार अजय देशपांडे सर यांनी मानले याप्रसंगी त्यांनी उपस्थित विद्यार्थ्यांना परीक्षेच्या संदर्भात मार्गदर्शन करताना यशस्वी माजी विद्यार्थ्यांचे कौतुकही केले.

# तीन लाख तीन हजार रुपये किंमतीच्या मोटरसायकलींसह एक बुलेट गाडी जप्त,



किनवट: शेख शौकत :-किनवट पोलीस ठाण्याच्या हद्दीतील सावरी येथिल बहुचर्चीत अट्टल मोटर सायकल चोर/गुन्हेगार बालाजी मसी यास नांदेडच्या स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने ताब्यात घेतल्यानंतर त्याच्याकडून गुन्ह्यातील सात मोटरसायकलींसह एक बुलेट गाडी जप्त करण्यास पोलीस पथकाला यश मिळाले. नांदेड पोलीस पथकाला वांटेड मसी हा शेवटी पोलीसांच्या हाती लागलाच. हा मसी फक्त मोटारसायकल चोरी पुरताच सिमित आहे की, घरफोड्या करतो हे अधिक तपासातून समोर आल्यास पोलीसांची डोके दुखी कमी होऊ शकते असा लोककयासातून ऐकायला मिळते. नांदेड पोलीसांच्या कारवाईत तीन लाख तीन हजार रुपये किंमतीच्या आठ मोटारसायकली हस्तगत केल्या. माल जप्त केला आहे. अट्टल मोटारसायकल चोर बालाजी मसी याने किनवट पोलीस ठाण्याच्या हद्दीतीलच पार्किंग नव्हे तर वेगवेगळ्या ठिकाणावरून चोरलेल्या गाड्यांची पथकाला कबुली तर दिलाच, शिवाय गाड्याही मिळवून दिल्या. किनवट पोलीसांच्या हद्दीतील चोरी गेलेल्या बहुतांशमोटारसायकलींचा अद्यापही शोध लागलेला नाही. नांदेड पोलीसांनीच छडा लावल्यास अशा चोरट्यांकडून मिळतील अशा लोकांच्या आशा पल्लवीत होतांना दिसतात. पोलीस निरीक्षक चोपडे, पोलीस स्टेशन किनवट पीएसआय झाडे, गुन्हे शाखा नांदेडचे पीएसआय पूयड, पोलीस हवालदार सुरेश घुगे, पोलीस अमलदार विलास कदम, घोगरे, कदम, बिचकेवार, सहा. पोलीस उपनिरीक्षक आपाराव राठोड, पो.कॉ. कुडमेते यांचा या पथकात समावेश होता.

# शिवजयंतीचे औचित्य साधून वृंदावन वॉटर पार्क येथील व्हेव पुलाचे सहकारमंत्री ना. बाबासाहेब पाटील यांच्या हस्ते उद्घाटन






चाकूर :- साई नंदनवन परिसरातील वृंदावन अम्युजमेंट पार्कच्या दुसऱ्या टप्प्यातील विस्तारीकरण अंतर्गत मराठवाड्यातील सर्वात मोठ्या व्हेव पुल लाटांचा समुद्र या राईडचा शुभारंभ व श्रीकृष्ण सत्यसाई संस्थान चाकूर च्या वतीने होतकरू विद्यार्थ्यांना आर्थिक मदतीच्या धनादेशाचे वाटप तसेच संस्थांच्या संकेतस्थळाचे अनावरण सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांच्या हस्ते बुधवारी शिवजयंती दिनी संपन्न झाले.

मराठवाड्यातील आधुनिक पर्यटन स्थळ म्हणून साईनंदनवनम अम्युजमेंट वॉटर पार्क प्रसिद्ध आहे. येथे श्रीकृष्ण सत्यासाईबाबांचे देवस्थान आहे. भक्तिस्थळासोबतच वॉटर पार्क, निसर्गरम्य परिसरात असणारी सौंदर्यसृष्टी, बोटिंग, डॅशिंग कार, रेल्वे, सह विविध राईड्स उपलब्ध आहेत. निसर्गाच्या सान्निध्यात हुरडा पार्टी, प्रिविडिंग शूट ,उत्तम जेवणाची मेजवानी, खूप सारी मोजमस्ती आणि विरंगुळा करण्यासाठीचे एक परिपूर्ण असे पर्यटन स्थळ निर्माण झाले आहे. श्रीकृष्ण सत्यसाई प्रतिष्ठान चे सर्वेसर्वा उत्तमराव जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली विशाल जाधव अमोल जाधव बंधू जे जे नवे ते हेवे. म्हणून प्रतिवर्षी या पर्यटन स्थळी नव्या राइट्स पर्यटकांच्या सेवेत उपलब्ध करून देतात. शिवजयंतीच्या मंगल प्रसंगी मराठवाड्यातील सर्वात मोठा कृत्रिम व्हेव पुल पर्यटकांना उपलब्ध करून दिला आहे. तर संकेत स्थळ वेब साईट चे आणावरन करण्यात आले.याच प्रसंगी प्रतिष्ठान च्या वतीने गरीब होतकरू विद्यार्थ्यांना शैक्षणिक मदतीसाठी धनादेशाचे वाटप ही सहकार मंत्री आमदार बाबासाहेब पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी श्रीकृष्ण सत्यसाई प्रतिष्ठानचे अध्यक्ष उत्तमराव जाधव, नगराध्यक्ष कपिल माकणे, उपविभागीय अधिकारी डॉ मंजुषा लटपटे,मुख्याधिकारी प्रतीक लंबे, करीम गुळवे,पोलीस निरीक्षक दत्तात्रय निकम, सिध्दी शुगर चे अविनाश पाटील, शिवाजीराव पाटील,बालाजीराव सूर्यवंशी, हेमंतराव जाधव, सागर होळदांडगे, मुर्तुजा सय्यद,सामजिक कार्यकर्त्या वैशाली यादव, अनिल वाडकर, संदीप शेटे, अँड संतोष गंभिरे, प्रा बी डी पवार, मधुकर मुंडे , सुभाष काटे यांच्यासह मान्यवर उपस्थित होते कार्यक्रमाचे प्रस्ताविक विशाल जाधव यांनी केले तर आभार अमोल जाधव यांनी मांडले.

# पोटावर वाढलेली चरबी कमी करण्यासाठी चालण्याच्या 'या' सवयींमध्ये करा बदल, आठवड्याभरात दिसून येईल फरक





पोटावर आणि शरीरावर वाढलेली अनावश्यक चरबी कमी करण्यासाठी महिला आणि पुरुष सतत काहींना काही उपाय करत असतात. कधी जिममध्ये जाऊन तासनतास व्यायाम करणे तर कधी बाजारात उपलब्ध असलेले वेगवेगळे प्रोटीन ड्रिंक प्यायले जातात. मात्र याचा फारसा परिणाम त्वचेवर दिसून येत नाही. वेगवेगळ्या पद्धतीचे डाएटिंग केल्यामुळे शरीरावर नकरात्मक परिणाम दिसून येतात. त्यामुळे कोणत्याही गोष्टी करताना शरीराला सूट होईल की नाही याची योग्य माहिती घेऊन मगच करावी. वजन कमी करण्यासाठी अनेक महिला एक वेळेचं जेवण केले जाते. मात्र असे केल्यामुळे वजन कमी होण्याऐवजी आणखीनच वाढण्याची शक्यता असते. त्यामुळे वजन कमी करताना योग्य आहार घेणे आवश्यक आहे. वाढलेले वजन कमी करण्यासाठी जिम किंवा डाईट करण्याऐवजी चालणे आवश्यक आहे. नियमित चालल्यामुळे शरीरावर वाढलेली अतिरिक्त चरबी कमी होते आणि शरीराला अनेक फायदे होतात. नियमित चालल्यामुळे शरीराचे स्नायू सक्रिय होतात आणि कॅलरीज बर्न होतात. ज्यामुळे शरीरावर अतिरिक्त चरबी कमी होते. आज आम्ही तुम्हाला वाढलेले वजन कमी करण्यासाठी चालण्याच्या कोणत्या सवयींमध्ये बदल करावे, याबद्दल सविस्तर माहिती सांगणार आहोत. चला तर जाणून घेऊया.

जलद हालचाली करणे: सकाळी उठल्यानंतर वाढलेले वजन कमी करण्यासाठी अनेक लोक चालण्यासाठी जातात. मात्र हळूहळू चालल्यामुळे शरीरावर वाढलेली चरबी कमी होत नाही. त्यामुळे वाढलेले वजन कमी करण्यासाठी वेगाने चालणे आवश्यक आहे. वेगाने चालल्यामुळे हृदयाची गती वाढते आणि श्वास घेण्याच्या प्रक्रिया वाढू लागते. यामुळे शरीरात कॅलरीज बर्न होतात. वेगाने चालल्यामुळे शरीराचे चयापचय वाढते.

विश्रांती घेऊन चालणे:

काहींना चालल्यानंतर लगेच थकल्यासारखे वाटते किंवा दम लागतो. अशावेळी तुम्ही वाढलेले वजन कमी करण्यासाठी इंटरवल वॉकिंग करू शकता. थोडेसे चालून नंतर विश्रांती घेत चालल्यामुळे शरीराचे चयापचय वाढते आणि कॅलरीज बर्न होतात. यासाठी तुम्ही दुपारच्या वेळी किंवा संध्याकाळच्या वेळी चालण्यास जाऊ शकता.

डोंगरावर चालण्यासाठी जाणे:

वाढलेले वजन कमी करण्यासाठी शरीर सक्रिय ठेवणे आवश्यक आहे. यामुळे शरीराची लवचिकता वाढते आणि वाढलेले वजन कमी होण्यास मदत होते. डोंगरावर चालण्यासाठी डोंगर आणि उंच ठिकाणी जाण्याची आवश्यकता नाही. यासाठी तुम्ही घराच्या पायऱ्यांवर किंवा पायऱ्या असलेल्या ठिकाणी चालण्यासाठी जाऊ शकता.

रोगप्रतिकारशक्ती सुधारते:

शरीराची रोगप्रतिकारशक्ती सुधारण्यासाठी नियमित चालणे आवश्यक आहे. नियमित चालल्यामुळे सर्व आजार बरे होतात. यासाठी नियमित २० ते ३० मिनिटं चालणे आवश्यक आहे. रोगप्रतिकारशक्ती सुधारण्यासोबत मानसिक तणाव आणि मूड सुधारण्यास मदत होते. झोपेची गुणवत्ता सुधारण्यासाठी नियमित १५ मिनिटं चालणे आवश्यक आहे.

# वसंतराव नाईक महाविद्यालयात शिवाजी जयंती साजरी

छ.संभाजीनगर / प्रतिनिधी :- १९ फेब्रुवारी २०२५ रोजी वसंतराव नाईक महाविद्यालयात छत्रपती शिवाजी महाराज जयंती साजरी करण्यात आली या निमित्ताने मा. श्री . किशोरजी शितोळे यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले होते, याप्रसंगी संस्थेचे सचिव श्री. नितीनजी राठोड , प्राचार्य डॉ.संजय शिंदे , उपाध्यक्ष श्री. अभयजी राठोड व कोषाध्यक्ष श्री. बिपीनजी राठोड यांची प्रमुख उपस्तिथी होती. सर्वप्रथम सर्व मान्यवरांनी महाराजांच्या प्रतिमेस अभिवादन केले.प्रा.प्रविण बोबडे यांनी मानवंदना गीत सादर केले .याप्रसंगी सेवा गौरव पुरस्कार मिळाल्याबद्दल संस्थेचे अध्यक्ष समाजभूषण प्राचार्य राजारामजी राठोड यांचा किशोरजी शितोळे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. सत्कारानंतर मा. राजारामजी राठोड यांनी सत्कारास उत्तर दिले. आपल्या प्रास्ताविकात डॉ. संजय शिंदे यांनी आजच्या काळात छत्रपती शिवाजी महाराज यांच्या विचारांचे महत्त्व विषद करून महाराजांनी स्त्री–पुरूष समतेचे बिजारोपन केले, शस्त्रबंदीचा नियम मोडून बहुजनांच्या हातात शस्त्र दिले, वतनदारी पध्दत बंद केली, महाराजांनी कुठलीही लढाई धर्माच्या विरोधात लढली नाही असे आदर्श राजे जगात झाले नाहीत मा. किशोरजी शितोळे यांनी छत्रपती शिवाजी महाराजांवर आजवर साहित्यातून विपूल लेखाण झालेले असून ते मांडताना साधनशूचिता हवी असे प्रतिपादन केले .महाराजांच्या नितीला समजून घेतांना त्याकाळातील सामाजिक, राजकीय , धार्मिक परिस्थिती आणि काळाचा अभ्यास केला पाहिजे. आज घरात तुळस आणि मंदिरावर कळस आहे ते केवळ महाराजांमुळेच! महाराजांनी स्वराज्यासाठी शेतकऱ्याच्या हाती शस्त्र दिले. महाराजांचे नियोजन, युद्धनीती , दूरदृष्टी युवकांनी समजून घेतली पाहिजे. हीच आजच्या काळाची खरी गरज आहे असे मत त्यांनी व्यक्त केले.





आपल्या अध्यक्षीय समारोपात श्री. नितीनजी राठोड यांनी छत्रपती शिवाजी महाराज जयंतीनिमित्त आपण महाराजांच्या विचारांना कृतीत आणणे आवश्यक असून युवकांनी चारित्र्यवान बनण्याचा प्रयत्न केला पाहिजे असे आवाहन केले.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ . कमलेश महाजन यांनी तर आभार प्रदर्शन श्री .दहिफळे यांनी मानले या प्रसंगी बळीराम पाटील,व्ही.आर.इंग्लीश स्कूल, वसंतराव नाईक महाविद्यालयातील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी यांची मोठ्या प्रमाणावर उपस्थिती होती.

## छत्रपती शिवाजी महाराजांचे कार्य आणि विचार आचरणात आणण्याची गरज–वसुदेव गायकवाड



केज/प्रतिनिधी स्वानंद सार्वजनिक वाचनालय, आनंदगांव ता. केज. जि. बीड येथे १९ फेब्रुवारी २०२५ रोजी स्वराज्य निर्माते छत्रपती शिवाजी महाराज जयंती शिव जन्मोत्सव साजरा करण्यात आला. अत्यंत साधेपणाने शिव – जन्मोत्सव साजरा करण्यात आला. यावेळी बोलताना छत्रपती शिवाजी महाराज जन्मोत्सव प्रसंगी विचार व्यक्त करताना माजी प्राचार्य, जेष्ठ विचारवंत, जेष्ठ समाजसेवक, ख्यातनाम वक्ते व व्याख्याते वसुदेव( बप्पा) गायकवाड म्हणाले कि,आजच्या काळात छत्रपती शिवाजी महाराजांचे विचार व कार्य प्रत्यक्ष आचरणात आणण्याची खरी गरज आहे असे प्रतिपादन वसुदेव गायकवाड यांनी केले. अध्यक्ष स्थानी सेवानिवृत्त मुख्याध्यापक छगननाना गायकवाड हे होते. प्रमुख उपस्थिती बाळासाहेब गायकवाड, संजय सोनवणे, नारायण गायकवाड, माजी सरपंच रामराजे गायकवाड, रावसाहेब जाधव, एस. के. वैरागे, यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाला वाचक, शिवभक्त, विद्यार्थी, ग्रामस्थ उपस्थित होते.

## हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे स्वच्छ, सुंदर बसस्थानक अभियान: विभागीय स्तरावरील समिती गठीत !अशासकीय पदी पत्रकार बालासाहेब शिंदे

लातूर / प्रतिनिधी :- सन २०२५ मध्ये हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे स्वच्छ, सुंदर बसस्थानक अभियान स्पर्धात्मक स्वरूपात राबविण्यात येणार असून, त्याअंतर्गत बसस्थानकांच्या स्वच्छतेसह सौंदर्यीकरण, सुविधा उन्नती आणि प्रवाशांच्या सोयींमध्ये सुधारणा करण्यावर भर दिला जाणार आहे. या अभियानाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी मराठवाड्यातील लातूर विभागीय स्तरावर एक विशेष समिती गठीत करण्यात आली आहे. विभागीय स्तरावरील समिती गठीत राज्य परिवहन महामंडळाच्या (रा.प.) आदेशानुसार विभागीय स्तरावर विभाग नियंत्रक यांच्या अध्यक्षतेखालील समिती स्थापन करण्यात आली आहे. या समितीमध्ये विविध क्षेत्रातील तज्ज्ञ आणि सामाजिक प्रतिनिधींना समाविष्ट करून प्रभावी निर्णयक्षम यंत्रणा उभारण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. यात ग्राहक पंचायत महाराष्ट्र राज्याचे जिल्हा संघटक, राज्य प्रवासी संघटनेचे जिल्हाध्यक्ष तथा शासन नियुक्त ग्राहक संरक्षण परिषदेचे अशासकीय सदस्य तसेच दैनिक पुण्यनगरी चे पत्रकार बालासाहेब गोविंदराव शिंदे अतनूरकर यांची प्रशासकीय पदाच्या समितीमध्ये अशासकीय नियुक्ती करण्यात आली आहे. या नियुक्तीचे पत्र विभागीय नियंत्रक अश्वजीत जानराव यांच्या हस्ते दि.१८ रोजी मंगळवारी विभागीय कार्यालयात प्रशासकीय पातळीवर असदस्यशीय सदस्यपदी बालासाहेब गोविंदराव शिंदे यांना देण्यात आले. समितीतील सदस्यांची नावे आणि जबाबदाऱ्या, समितीमध्ये खालील सदस्यांची नियुक्ती करण्यात आली आहे. अध्यक्ष श्री. अश्वजीत जानराव विभाग नियंत्रक रा.प.लातूर, सदस्य श्री.,विभागीय अभियंता, रा.प.लातूर, अशासकीय सदस्य श्री.बालासाहेब गोविंदराव शिंदे अतनूरकर, सदस्य श्री.आनंद माने लातूर असून वरील नवनियुक्त अध्यक्ष अशासकीय सदस्य पदाधिकारी हे समितीच्या खालील प्रमाणे जबाबदाऱ्या आणि कार्यपद्धती पार पाडतील. समितीची मुख्य जबाबदारी विभागातील 'ब' व 'क' वर्ग बसस्थानकांचे मूल्यांकन करणे आणि गुणवत्तेनुसार त्यांना पारितोषिकांसाठी शिफारस करणे आहे. मूल्यांकन करताना स्वच्छता, सुविधा, व्यवस्थापन, प्रवाशांसाठीच्या सोयी, देखभाल–दुरुस्ती यासारख्या महत्त्वाच्या निकषांचा विचार केला जाणार आहे. समितीने प्रत्येक तीन महिन्यांनी एकदा बसस्थानकांची तपासणी करून त्याचा अहवाल मध्यवर्ती समितीकडे पाठवायचा आहे. त्यासाठी नियोजित वेळापत्रकानुसार मूल्यांकन करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. अभियानाच्या यशस्वी अंमलबजावणीसाठी समितीच्या सदस्यांनी बसस्थानकांमध्ये थेट भेट देऊन स्थितीची पाहणी करणे आणि आवश्यक उपाययोजना सुचवणे अनिवार्य आहे. अभियानाची उद्दिष्टे आणि अपेक्षित परिणाम या अभियानाच्या माध्यमातून संपूर्ण राज्यातील बसस्थानकांच्या सौंदर्यीकरणावर भर दिला जाणार असून प्रवाशांना स्वच्छ, सुरक्षित आणि अत्याधुनिक सुविधा मिळाव्यात, हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश आहे. स्पर्धात्मक दृष्टिकोन ठेवून कार्यरत बसस्थानकांना प्रेरित करणे, उत्कृष्ट सेवा देणाऱ्या बसस्थानकांना गौरविणे आणि त्यामुळे एकूणच परिवहन व्यवस्थेचा स्तर उंचावणे हे यामागील प्रमुख उद्दिष्ट आहे. या मोहिमेमुळे राज्यातील बसस्थानके स्वच्छ आणि आकर्षक होण्यास मदत होईल. प्रवाशांचा प्रवास अधिक सुखकर होईल आणि सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेवर त्याचा सकारात्मक परिणाम दिसून येईल. अभियानाच्या यशस्वी अंमलबजावणीसाठी संबंधित अधिकाऱ्यांसह सामाजिक संस्थांनीही पुढाकार घ्यावा, असे आवाहन विभागीय नियंत्रक अश्वजीत जानराव तसेच शासकीय सदस्य बालासाहेब गोविंदराव शिंदे अतनूरकर व परिवहन महामंडळाकडून करण्यात आले आहे. राप महामंडळाच्या अशासकीय सदस्यपदी निवडीचे बालासाहेब गोविंदराव शिंदे यांना नियुक्तीचे पत्र देताना विभागीय नियंत्रक अश्वजीत जानराव, विभागीय लेखा अधिकारी गंडाळे अमित शाहूराज, विभागीय सांख्यिकी अधिकारी अतुल वळसंगकर, निरीक्षक अधिकारी व्यंकटराव बिरादार–पाटील नागलगावकर, अपघात विभागाचे अधिकारी शिवकुमार देशमुख प्रामुख्याने उपस्थित होते.



## शारीरिक व्यंग घेऊन जन्माला आलेल्या पोरांनी धड धाकड असणाऱ्यांना प्रेरणा देत मिळवले यश.

### अभिनंदन दिव्यांग गोल्ड मेडलिस्ट..!

केज/प्रतिनिधी – केज येथील मुंदडा ताई सेवाभावी संस्था संचलित जीवन शिक्षण निवासी अस्थिव्यंग विद्यालयातील विद्यार्थ्यांनी जिल्हा स्तरीय दिव्यांग क्रीडा स्पर्धेत सहभाग नोंदवत –१०० मीटर धावणे प्रथम पठाण आयान आसिफ, २०० मीटर धावणे प्रथम पठाण आयान आसिफ,गोळा फेक प्रथम गौरव गालफाडे, व्हीलचेअर रेस व १०० मीटर धावणे गौरव गालफाडे द्वितीय, सॉफ्टबॉल द्वितीय रोहन डोंगरे,व्हील चेअर रेस परसु काळे द्वितीय,१०० मीटर धावणे–योगेश लोंढे तृतीय,व्हील चेअर रेस–आरती काळे तृतीय असे क्रमांक पटकावत विभागीय स्पर्धांसाठी पात्र ठरले. या त्यांच्या यशात त्यांचे क्रीडा शिक्षक व सर्व कर्मचारी यांनी कठोर परिश्रम घेतले. संस्था सचिव श्री. हरूणभाई इनामदार,सहसचिव श्री यासीन इनामदार,मार्गदर्शक श्री.हांडीबाग सर,श्री. गोविंद ठोंबरे सर यांच्या मोलाच्या सहकार्य व प्रेरणेने शाळेचे मुख्याध्यापक श्री.विनायक ठोंबरे सर यांच्या मार्गदर्शनाने हे शक्य झाले. त्यांच्या या यशाबद्दल संकुलाचे प्रशासकीय अधिकारी मुख्याध्यापक श्री.रमाकांत ढाकणे सर व सहाय्यक मुख्याध्यापक श्री.संदिप गुळवे सर यांच्या हस्ते सर्व गुणवंत खेळाडूंचे व कर्मचारी वृंदांचे सत्कार करून कौतुक करण्यात आले.



## लातूर स्त्री रोग संघटनेने पटकावला राज्यातील सर्वोत्कृष्ट संघटनेचा प्रथम पुरस्कार डॉ. मनिषा बरमदे, डॉ. शितल लाड व डॉ. कल्याण बरमदे पुरस्काराने सन्मानित

लातूर : चंद्रपूर येथे नुकत्याच पार पडलेल्या अखिल महाराष्ट्र स्त्री रोग संघटनेच्या वार्षिक सर्वसाधारण परिषदेत लातूर स्त्री रोग संघटनेला राज्यातील सर्वोत्कृष्ट स्त्री रोग संघटना म्हणून डॉ.एम.व्ही.चितळे उत्कृष्ट स्त्री रोग संघटना प्रथम पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. भाजपचे ज्येष्ठ नेते, माजी मंत्री आमदार सुधीर मुनगंटीवार यांच्या हस्ते हे पुरस्कार प्रदान करण्यात आले. चंद्रपूर येथे नुकत्याच पार पडलेल्या अखिल महाराष्ट्र स्त्री रोग संघटनेच्या वार्षिक सर्वसाधारण परिषदेस माजी मंत्री आमदार सुधीरभाऊ मुनगंटीवार यांच्यासह अखिल भारतीय स्त्री रोग संघटनेच्या अध्यक्षा डॉ. सुनीता तांदुळवाडकर, महाराष्ट्र स्त्री रोग संघटनेचे अध्यक्ष डॉ. किरण कुर्तकोटी, सचिव डॉ. बिपिन पंडित, परिषदेच्या अध्यक्षा डॉ. मनिषा घाटे, परिषदेच्या सचिव सचिव डॉ. कल्पना गुलवाडे आदी मान्यवरांची प्रमुख उपस्थिती होती. या परिषदेत लातूर स्त्री रोग तज्ज्ञ संघटनेस राज्यातील सर्व जिल्ह्यांच्या तुलनेत उत्कृष्ट आरोग्य सेवा व उपक्रम राबविल्याबद्दल प्रथम पुरस्कार प्रदान करण्यात आला. डॉ. मनिषा कल्याण बरमदे यांना आरोग्य तसेच विविध आरोग्य विषयक उपक्रम यशस्वीपणे राबविल्याबद्दल सामाजिक कार्य पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. डॉ. शितल लाड यांना युवा पुरस्कार तर ज्येष्ठ स्त्री रोग व वंध्यत्व निवारण तज्ज्ञ डॉ. कल्याण बरमदे यांना स्त्री रोग संघटनेसाठी राष्ट्रीय पातळीवर केलेल्या कार्याबद्दल विशेष पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. ग्रामीण भागातील सर्वच क्षेत्रात भारतीय स्त्री रोग संघटना पोहोचवून तळागाळातील स्त्रियांच्या आरोग्य विषयक समस्या सोडविण्यासाठी लातूर स्त्री रोग संघटनेने यांनी अतिशय मौलिक कार्य केले आहे व अद्यापही त्यांचे हे कार्य सुरूच आहे. डॉ. कल्याण बरमदे यांनी महिलांच्या आरोग्यविषयक राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय पातळीवरील अनेक परिषदांना उपस्थिती नोंदवून त्यांनी वेळोवेळी मार्गदर्शन करण्याचे काम केले आहे. त्यांच्या या कार्याची दखल घेऊन महाराष्ट्र स्त्री रोग संघटनेच्या वतीने त्यांना विशेष पुरस्काराने गौरविण्यात आले. लातूर स्त्री संघटनेच्या अध्यक्षा डॉ प्रतिभा पाटील, सचिव डॉ. मनिषा बरमदे व कोषाध्यक्षा डॉ अनुसया वलसे यांच्या कुशल नेतृत्वात लातूर स्त्री रोग संघटनेस हा पुरस्कार मिळाला आहे. २०२४ – २५ या वर्षात लातूर स्त्री रोग संघटनेच्या माध्यमातून राष्ट्रीय परिषद, स्त्री रोग विषयक कार्यशाळा व विविध सामाजिक कार्य, जसे शाळा – महाविद्यालयात जाऊन मुलींना आरोग्यविषयक मार्गदर्शन करणे, एचपीव्ही व्हॅक्सिनेशन संदर्भात समुपदेशन करणे व महिलांसाठी मोफत आरोग्यशिबीर घेणे असे विविध कार्यक्रम या वर्षात घेण्यात आले. या कामाची दखल घेऊन महाराष्ट्र स्त्री रोग संघटनेने हा पुरस्कार दिला आहे. हा पुरस्कार मिळाल्याबद्दल स्त्री रोग तज्ज्ञ डॉ. निलंगेकर, डॉ. जाजू, डॉ. भालचंद्र, डॉ. देशमुख, डॉ. गोरे, डॉ. सारडा आदी स्त्री रोग तज्ज्ञांनी सत्कारमूर्तींचे अभिनंदन केले आहे.




## इंडिया प्राइड बुक ऑफ रिकॉर्ड्र्स पुरस्काराने सुनील इंगळे सन्मानित

कल्याण:(प्रतिनिधी)लेवा पाटीदार समाजातील आदरणीय व्यक्तिमत्व लेवा भूषण सुप्रसिद्ध सामाजिक कार्यकर्ते समाजसेवक पत्रकार व नेत्रदान सोबत देहदान चळवळीचे पुरस्कर्ते सुनील इंगळे यांना इंडिया प्राउड बुक ऑफ रेकॉर्ड्स हा पुरस्कार संबंधित इंटरनॅशनल संस्थेचे कवी कलाध्यापक व्याख्याते श्री संदीप ईश्वर पाटील सर यांच्या शुभहस्ते व सोबत प्राध्यापक जयंत राणे व योगाचार्य प्रमोद शिंदे हे उपस्थित होते. नेहमीच निष्काम कर्मयोगी कार्यात दखलपात्र कार्य केल्याबद्दल ते या पुरस्काराचे मानकरी ठरले आहेत. राष्ट्रभक्तीचे ज्योत तेवत ठेवणे समर्पित भावनेने निरपेक्षपणे सेवावृत्ती होऊन कर्मयोग करणे सहकार्यांना प्रोत्साहित करून नवचैतन्य निर्माण करणे हे त्यांचे वैशिष्ट्य आहे. नेत्रदान व देहदानाचे ते पुरस्कर्ते असून यावर त्यांचा ठाम विश्वास आहे. इंगळे यांचे सामाजिक काम हे दैदित्य मान आणि जबरदस्त असून नेहमीच ते स्वयंस्फूर्तीने समाजकार्यात झोकून देऊन कार्यरत असतात विविध संस्थांनी त्यांच्या या निरपेक्ष समाजसेवेची निर्भीड पत्रकारितेची दखल घेऊन अशा या अष्टपैलू व्यक्तिमत्त्वास ६५ पेक्षा अधिक राज्यस्तरीय पुरस्काराने व एका राष्ट्रपती पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे, या यशाबद्दल सामाजिक शैक्षणिक आणि सांस्कृतिक क्षेत्रात त्यांचे विशेष अभिनंदन होत आहे.




## श्रीमती सुभाई बहूउद्देशीय सेवा भावी संस्थेच्या वतीने छत्रपती शिवाजी महाराज जयंती साजरी

लातूर :- १९ फेब्रुवारी रोजी पुर्व भागातील गवळी नगर भागात श्रीमती सुभाई बहूउद्देशीय सेवा भावी संस्थेच्या वतीने छत्रपती शिवजी महाराज यांची ३९५ वी जयंती उत्साहात साजरी जयंती निमित्त प्रमुख पाहुणे महाराणा प्रताप ग्रामपंचायत सदस्या सौ. रत्नमाला घोडके,लातूर शहर पूर्व भाग कृती समितीचे अध्यक्ष दिपक गंगणे व श्रीमती सुभाई सेवा भावी संस्थेच्या अध्यक्षा सौ.निर्मला कांबळे यांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन करून पुष्प वाहून विनम्र अभिवादन करून छत्रपती शिवाजी महाराज की जय जय भवानी जय शिवाजी घोषणा देत मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली.यावेळी प्रस्ताविकात सौ.रत्नमालाताई घोडके यांनी छत्रपती शिवाजी महाराजांवर आदर्श राष्ट्र माता राजमाता जिजाऊ यांनी पेरलेल्या बाल संस्कारातून आदर्श राजा जगाला दिला राष्ट्रमाता जिजाऊ संस्काराचा आदर्श प्रत्येक महिलांनी घेण्याचे सांगितले.यावेळी सौ. रत्नमालाताई घोडके,दिपक गंगणे यांनी छत्रपती शिवाजी महाराज आदर्श राज्यकर्ते असल्याचे प्रतिपादन करून शिव जयंतीच्या शुभेच्छा दिल्या यावेळी गणेश घोडके,सौ. कविता कांबळे,मीरा कांबळे,सोनाली गायकवाड,उषा कल्लेकर,रेखा साळुंके,मीरा सुर्यवंशी,शुभांगी चमके ,बालीका ऐनकेमुरीकर,आश्विनी ताडमाडगे,पदमिनबाई गायकवाड,कविता बनसोडे,प्रिती गीरी,विक्की गिरी,शुभम गिरी,सतीष ऐनकेमुरीकर,रमेश कांबळे सर,रोहन उबाळे,शुभम कांबळे तसेच परिसरातील महिला नागरीक युवक मोठ्या संख्येने उपस्थित होते.उपस्थितांचे आभार बाबासाहेब बनसोडे यांनी मांडले



PRINTED BY MAHESH MOTIRAM RATHOD, OWNED, PUBLISHED & EDITED BY ASHOK NAMDEVRAO HANWATE, PRINTED AT MAYUR PRINTERS, PLOT No. B-28, MIDC, NEAR BUS STAND 03, LATUR, Tq. & DIST. LATUR - 413512 (M.S.) PULISHED AT : KHADAK HANUMAN, MILIND NAGAR, LATUR TQ. & DIST. LATUR - 413512 (M.S.) EDITOR : ASHOK NAMDEVRAO HANWATE